डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या विद्यापीठास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात लेखाशिर्ष (२४१५ १०१२),०४ निवृत्तिवेतन विषयक खर्च या बाबीसाठी निधी वितरीत करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : कोकृवि-११२६/प्र. क्र.२५/ई-१५५७२३७/७-अे,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १८.०२.२०२६.

**संदर्भ :- नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली यांचे पत्र क्र.डॉबासाकोकृवि/ लेखा-३ /एन.पी.एस/५९४/२०२५, दि.०२.०१.२०२६.**

**प्रस्तावना :-**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत अखिल भारतीय समन्वित संशोधन योजनेमध्ये कार्यरत असलेल्या राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या १४ टक्के शासन हिस्स्याची रक्कम अदा करण्यासाठी लेखाशिर्ष (२४१५ १०१२) अंतर्गत ०४, निवृत्तीवेतन विषयक खर्च याबाबीसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीमधून निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांनी संदर्भाधीन पत्रान्वये केली आहे. त्यानुषंगाने, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना लेखाशिर्ष (२४१५ १०१२) अंतर्गत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली या विद्यापीठास सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अखिल भारतीय समन्वित संशोधन योजनेमध्ये कार्यरत असलेल्या राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंशदानाची रक्कम अदा करण्यासाठी ८०, सर्वसाधारण लेखाशिर्ष (२४१५ १०१२) ०४, निवृत्तीवेतन खर्च याबाबीकरीता अर्थसंकल्पीत तरतूदीमधून रु.४८.०० लाख (अक्षरी रु. अठ्ठेचाळीस लाख फक्त) इतके अनुदान खालीलप्रमाणे वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(रु.लाखात)

| अ. क्र. | लेखाशिर्ष/उद्दीष्टे व बाब | आहरण व संवितरण अधिकारी | सन २०२५-२६ करीता अर्थसंकल्पीय तरतूद | या शासन निर्णयान्वये वितरीत करावयाचे अनुदान |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १) | ८० - सर्वसाधारण<br><br>(००)(०१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाला कर्मचाऱ्यांच्या अंशदानाच्या रकमेइतकी समतुल्य अंशदानाची रक्कम देण्यासाठी<br>सहायक अनुदान<br>०४,निवृत्तीवेतनविषयक खर्च<br>(२४१५ १०१२) (अनिवार्य) | सहायक लेखाधिकारी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी | ४८.०० | ४८.०० |
| | **एकूण** | | **४८.००** | **४८.००** |

२. **अटी व शर्ती**:-

१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली कृषि विद्यापीठास मंजूर करण्यात आलेले अनुदान महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ परिनियम, १९९०, आणि महाराष्ट्र कृषि विद्यापीठ लेखा संहिता, १९९१ मधील तरतूदीप्रमाणे आणि प्रचलित शासन आदेश व विहित कार्यपध्दतीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेतल्यानंतर विहीत मर्यादेत खर्च करण्यात यावे. केवळ अर्थसंकल्पीय तरतूद आहे किंवा अनुदान वितरीत केले आहे म्हणून खर्च करु नये.

२) सदर अनुदान कोणत्याही परिस्थितीत स्वीय प्रपंजी लेख्यात / PLA बँक खात्यात ठेवता येणार नाही.

३) सदर अनुदान सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातच खर्चासाठी सक्षम स्तरावर मान्यता घेऊनच खर्च करण्यात यावे.

४) अर्थसंकल्पीत अंदाजाव्दारे उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

५) निधी खर्च करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित अटी व शर्तींचे व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. विद्यापीठाचे नियंत्रक आणि इतर संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी उपरोक्त अटी व शर्तींचे काटेकोरपणे अनुपालन करावे.

४. सहायक लेखाधिकारी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,दापोली, जि.रत्नागिरी या आहरण व संवितरण अधिकारी यांनी वरीलप्रमाणे वितरीत केलेले अनुदान डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे नियंत्रक यांना अदा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

५. या प्रित्यर्थचा खर्च सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकात खालील लेखाशीर्षाखाली मंजूर केलेल्या तरतूदीतून भागवावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८० सर्वसाधारण

०४ निवृत्तीवेतन विषयक खर्च

(००) (०१) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ अंतर्गत अखिल भारतीय समन्वित संशोधन योजनेमध्ये कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन अंशदानाचा परतावा.

(२४१५ १०१२)

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०२१८१५४०४४७३०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MITALI KALPESH CHAUDHARI

Digitally signed by MITALI KALPESH CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agricuture and Adf Deparment,
2.5.4.20=4367a98b1913c401683f04d0604dddbf6104bd9b26a678a0c12daf8bc922cfea, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=60ae0791d92611a135ce51a5ee439203fdbdb395146d132620b3437eded658ce, cn=MITALI KALPESH CHAUDHARI
Date: 2026.02.18 15:41:50 +05'30'

**(मिताली चौधरी)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
३. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
४. कुलगुरु, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
५. कुलसचिव, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
६. नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी.
७. सहायक लेखाधिकारी, डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
८. सहायक लेखाधिकारी, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी/उपकोषागार अधिकारी, दापोली, जि. रत्नागिरी.
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
११.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१२.उप मुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ) स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१३.अवर सचिव/कक्ष अधिकारी (कार्यासन ७-अे/६-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१४.कार्यासन ७-अे (निवडनस्ती).